खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र २

## विषय

## सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती-II

## प्रकरण ३

## उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा सहकारी चळवळीवर होणारा परिणाम

# प्रकरण ३
# उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा सहकारी चळवळीवर होणारा परिणाम

## उदारीकरण –

१९९१ च्या उदारीकरणाच्या धोरणाने औद्योगिक क्षेत्रात मुलभूत बदल घडून आले. या धोरणाने परवानामुक्त धोरण राबविण्यास सुरूवात झाली. विशेषतः औद्योगिक परवाना पद्धत अत्यंत सुलभ केली. सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगाची संख्या कमी करून खाजगी उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या समभागांची निर्गुंतवणूक करण्यात आली, त्यामुळे खाजगी गुंतवणूकीला चालना मिळाली. विदेशी गुंतवणूकीबाबत उदार धोरण स्विकारण्यात आल्याने विदेशी उद्योजकांना देशात उद्योग सुरू करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

उदारीकरणाच्या धोरणाची मुख्य उद्दिष्टे म्हणजे मुलभूत सुविधा क्षेत्रात गाभा व अग्रक्रम क्षेत्र, निर्यातभिमुख उद्योग, शेती प्रभावी उद्योग या विविध उद्योगात विदेशी थेट गुंतवणूकीला चालना मिळावी इत्यादी उद्दिष्टे औद्योगिक क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात साध्य झाले आहे.

आर्थिक उदारीकरण म्हणजे किंमत यंत्रणेचा अधिक विस्तृतपणे वापर करणे, ज्यामुळे व्यापार पद्धतीची निर्यात विरोधी प्रवृत्ती कमी होईल व अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता वाढून स्पर्धा क्षमतेत वाढ होणे होय.

### उदारीकरणाचे परिणाम (Impact of Liberalization)

अ) उदारीकरणाचे अनुकूल परिणाम १.

१.जागतिकीकरणाला चालना मिळाली (MotivationtoGlobalization) :

उदारीकरणाच्या धोरणामुळे अर्थव्यवस्था खुली होत आहे. आयातनिर्यात व्यापार, परकीय गुंतवणूक यांना प्रोत्साहन मिळत आहे. विकसित देशांबरोबरच विकसनशील देशांनाही आपली विविध उत्पादने निर्यात करण्याची संधी मिळत आहे. आयात-निर्यात व्यापारामुळे व विदेशी गुंतवणूकीच्या विविध संधीमुळे जागतिक संबंधात वाढ होऊन जागतिकीकरणाचा पाया मजबूत झाला आहे.

२.अनावश्यक परवाना पद्धतीचे उच्चाटन (Cancellations of Unnecessary Permits) :

१९९० पूर्वी भारताच्या औद्योगिक क्षेत्रात सरकारी परवाना पद्धतीचे वर्चस्व होते. त्यातून भ्रष्टाचाराला अधिक वाव मिळत होता. शिवाय उद्योगांच्या स्थापनेत अडथळा येऊन औद्योगिक विकासावर त्याचा विपरीत परिणाम होऊन आर्थिक विकास दर देखील घटतो. उदारीकरणाच्या धोरणामुळे परमीट राज (परवाना राज) संपुष्टात आले.

३.समतोल प्रादेशिक विकासाला साहाय्य (Helped for balance Regional Development) :

पूर्वी भारतात आर्थिक व औद्योगिक विकासाबाबत फारच असमतोल होता. आर्थिक उदारीकरणाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे घटकराज्य सरकारांना अधिक अधिकार प्राप्त झाल्याने

मागासलेल्या राज्यांना आपला औद्योगिक विकास साधने सहज शक्य झाले. ज्या भौगोलिक प्रदेशात जी नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक तेथे अनेक उद्योग प्राधान्याने स्थापन कल्यामुळे तेथील लोकांना अधिक प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध होऊन समतोल प्रादेशिक विकासाला मदत झाली आहे.

४. सरकारी हस्तक्षेपावर नियंत्रण (Control over Government Intervention) :

उदारीकरणामुळे आयात-निर्यात व्यापार, उत्पादन व वितरण, भांडवल गुंतवणूक इ. क्षेत्रावरील अनावश्यक नियंत्रणे बऱ्याच प्रमाणात कमी झाली आहे. या धोरणानुसार उद्योग चालवण्याऐवजी त्यावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे काम सरकार करत असल्याने सरकारी हस्तक्षेप कमी झाला आहे.

५. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता (Availability of Modern Technology) :

उदारीकरणाच्या धोरणानुसार खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना वस्तूचे उत्पादन घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अत्याधुनिक यंत्रे व तंत्रज्ञान याची विकसित देशातून आयात करण्यासाठी सरकारची परवानगी घेणे आवश्यक नसल्याने उत्पादन कार्यात त्यांना अत्याधुनिक यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या देशात उत्पादन करू लागल्याने हे तंत्रज्ञान सहज आयात होऊ लागले.

६. थेट विदेशी गुंतवणूकीला चालना (Motivations to Foreign Direct Investment) :

भारताने उदारीकरणाचा अवलंब केल्याने या देशांमध्ये थेट परकीय गुंतवणूकीचा ओघ वाढला आहे. थेट विदेशी भांडवलाच्या उपलब्धतेमुळे या देशामध्ये अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या येऊ लागल्या आहे. त्यामुळे कच्च्या मालाच्या मागणीत वाढ, रोजगारात वाढ होऊन भारतात औद्योगिकीकरण व आर्थिक विकासाला चालना मिळू लागली आहे.

७. नवनवीन मूल्यांचा अंगिकार (Acceptance of New Value) :

उदारीकरणामुळे केवळ परकीय उद्योगच आपल्या देशात येतात असे नसून तेथील विकसित उद्योजकीय संस्कृती, ग्राहकाभिमुख दृष्टीकोन, अत्याधुनिक व्यवस्थापकीय दृष्टीकोन व सामाजिक जबाबदारीची जाणीव इ. मूल्यही भारतीय कार्य संस्कृतीत रूजली जातात. त्यातून भारतातील उद्योग व सामाजिक क्षेत्रात नव्या मूल्यांचा अंगिकार केला जात आहे.

ब) उदारीकरणाचे प्रतिकूल परिणाम (Demerits of Liberalization)

१. जागतिक स्तरावर विकसित देशांच्या वर्चस्वात वाढ (Its has increased the dominance of Developed Country) :

उदारीकरणाच्या आधारे जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) माध्यमातून विकसित देशांना विकसनशील देशांमध्ये आयात-निर्यात व्यापार, विदेशी भांडवल गुंतवणूक करण्यासाठी घालण्यात आलेले अनिष्ठ निर्बंध, अटी व व्यापारशर्ती शिथिल करण्यात आल्या. परिणामी अधिक उत्पादकता व निर्यातक्षम उत्पादकतेसाठी प्रसिद्ध असलेल्या अमेरिका व अन्य विकसित राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय व्यापारावर अनिबंध वर्चस्व निर्माण झाले आहे.

२. विकसनशील देशांसमोर तीव्र गळेकापू स्पर्धा निर्माण झाली (Generated a Cutthroat competition in Developing Country) :

उदारीकरणामुळे जगातील सर्वबाजारपेठा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने एकमेकांशी जोडल्या गेल्या. यामुळे विकसित देशातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, कार्यक्षम व्यवस्थापन व भांडवल गुंतवणूक विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात केली जाऊ लागल्याने विकसनशील देशांना बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर स्पर्धा करणे, उत्पादनाचा दर्जा वाढविणे, प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे यासारख्या तीव्र स्वरूपाच्या गळेकापू स्पर्धेला तोंड देणे अशक्य झाले.

३. पारंपारिक व्यवसाय संपुष्टात आले (Ended Traditional Occupations) :

आर्थिक उदारीकरणामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या भारतासारख्या विकसनशील देशात येऊ लागल्याने त्यांना श्रमविभागणी व विशेषीकरणाचा अवलंब करून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यास सुरूवात केल्याने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, आधुनिक व्यवस्थापन पद्धती इत्यादी पुढे भारतातील पारंपारिक व्यवसाय व उद्योग स्पर्धा करू शकले नाही व कालांतराने पारंपारिक व्यवसाय व उद्योग बंद पडले.

४. चंगळवाद व उपभोगात वाढ ( Increased in Consumerism) :

आर्थिक उदारीकरणामुळे विकसित देशातील संस्कृती, मानवी मूल्य, राहणीमान इ. चा प्रभाव विकसनशील देशांवर पडू लागला. तसेच विकसित देशातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी वस्तू उत्पादने व सेवा उत्पादने विकसनशील देशात घेण्यास सुरूवात केल्याने विकसनशील देशातील युवा वर्ग हा विकसित देशातील संस्कृतीचे अनुकरण करतांना विदेशी वस्तू, सेवांची मोठ्या प्रमाणात खरेदी करतो व त्यामुळे चंगळवादी प्रवृत्तीत वाढ होते.

## खाजगीकरण (Privatisation)

खाजगीकरण हा जागतिकीकरण प्राप्त करण्यासाठीचा एक राजमार्ग आहे. खाजगीकरणाचे तीन अर्थ होतात. पहिला म्हणजे प्रतिराष्ट्रीयीकरण करणे म्हणजे शासकीय संस्था व उद्योग पूर्ण खाजगी क्षेत्राला विकणे, दुसरा म्हणजे निर्गुंतवणूक करणे म्हणजेच शासकीय संस्थांमधून किंवा उद्योगातून सरकारी गुंतवणूक काढून घेणे, तिसरा मार्ग म्हणजे खाजगी क्षेत्राचे महत्त्व वाढविणे.भारतातील खाजगीकरणाचा खरा अर्थ मात्र निर्गुंतवणूक (Disinvestment) करणे हा आहे.

**खाजगीकरण व्याख्या**

१. जागतिक विकास अहवाल १९८७ : खाजगीकरण म्हणजे उत्पादक साधन सामग्रीचे सार्वजनिक मालकीकडून खाजगी मालकीकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया होय.

२. प्रो. लिंडसे : अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व (प्राबल्य) कमी करून खाजगी क्षेत्रास सर्व उत्पादन क्षेत्रात मुक्त प्रवेश देण्याची प्रक्रिया म्हणजे खाजगीकरण होय.

३. डेव्हीड हेरॉल्ड : अर्थव्यवस्थेतील साधनसामग्रीच्या उपयोगासाठी किंवा वाटपासाठी बाजारयंत्रणा पद्धतीचा स्विकार करण्याची प्रक्रिया म्हणजे खाजगीकरण होय.

**खाजगीकरणाचे परिणाम (Impact of Privatization)**

अ) खाजगीकरणाचे अनुकूल परिणाम (Merit of Privatization)

१. सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमतेवर नियंत्रण (Control on Public Sector Inefficiency) :

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये 'सरकारी' कार्यपद्धतीनुसार अकार्यक्षम व्यवस्थापन केले जाते. भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, अयोग्य व्यवस्थापन, व साधनसंपत्तीचा अपव्यय, अतिरिक्त नोकरभरती, दिवसेंदिवस वाढत जाणारा तोटा असे अनेक दोष सार्वजनिक क्षेत्रात आढळतात. त्यामुळे या उद्योगांची कार्यक्षमता कमी होऊन उत्पादनक्षमता दर्जा यांवर प्रतिकूल परिणाम होतो. अशा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाची मालकी व व्यवस्थापन खाजगी व्यक्तीकडे दिल्यास वरील सर्व दोष दूर होऊन नफा वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातून अशा उद्योगाच्या कार्यक्षमतेत उत्पादनात व दर्जात सुधारणा होऊन त्यांच्या निर्यातीत वाढ होते.

२. सार्वजनिक कर्जाचा बोजा कमी होतो (Less burden on Public Debt) :

१९९१ पूर्वी सार्वजनिक उद्योगांमध्ये शासनाचे अब्जावधी रूपयांचे भांडवल गुंतलेले होते. असे सार्वजनिक उद्योग अकार्यक्षमपणे चालल्याने बंद पडून शासनाचे भांडवल बुडण्याचा धोका असतो. अशावेळी या उद्योगांचे निगुंतवणूकीचे धोरण राबवून अशा उद्योगांचे खाजगीकरण केल्यास शासनाने पूर्वी केलेली गुंतवणूक परत मिळते व तो पैसा विकास कामासाठी वापरता येतो. त्यातून शासनाचा कर्जाचा बोजाही कमी करता येतो.

३.सरकारचा कार्यभार व जबाबदारी कमी होते (Less workload and responsibility on Governments) :

सार्वजनिक उद्योगाची मालकी व व्यवस्थापन शासनाकडे असल्यास शासनाच्या कार्यभारात व खर्चात वाढ होते. या उद्योगांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती, त्या अधिकाऱ्यावर नियंत्रण या उद्योगासाठी धोरण आखणे, खर्चाच्या तरतूदी करणे, ही कामे शासकीय यंत्रणेला करावी लागतात. उद्योग चालवणे हे सरकारचे काम नाही, असा युक्तीवाद अर्थतज्ज्ञ करतात. यामुळे अशा प्रकारच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा खाजगीकरण हा एक उत्तम मार्ग आहे असे म्हटले जाते. त्यामुळे सरकारचा कार्यभार व जबाबदारी कमी होऊन, सरकारला राज्यकारभार करण्याच्या मुख्य कार्याकडे लक्ष देता येते.

४. उद्योगांचा विकास व विस्तार होतो (Development and Expansion of Industry) :

सार्वजनिक क्षेत्रात नफा व वैयक्तिक लाभाची प्रेरणा नसल्याने असे जास्त उद्योग अकार्यक्षमपणे चालविल्याने तोट्यात जातात असा अनुभव आहे. तोट्यात चालणारे सार्वजनिक उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपविल्यास हे उद्योग कार्यक्षमपणे चालविणे शक्य होते. त्यामुळे पुढे या उद्योगाची वाढ होते. त्यातून रोजगार निर्मितीला चालना मिळून देशाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होतो.

५. नैसर्गिक व मानवी संसाधनाचा पर्याप्त वापर (Optimum uses of natural and human resources) :

सतत तोट्यात चालणाऱ्या व आजारी अकार्यक्षम सार्वजनिक उद्योगांमुळे राष्ट्रीय साधनसंपत्तीचा अपव्यय होत असतो असे तोट्यात चालणाऱ्या आजारी व अकार्यक्षम उद्योग आधुनिक यंत्रे, तंत्रज्ञान व

व्यवस्थापन यांचा प्रभावीपणे वापर करून ते अधिक कार्यक्षमपणे चालवून नैसर्गीक व मानवी संसाधनाचा योग्य वापर करण्याचा खाजगीकरण हा एक योग्य मार्ग आहे.

६. खाजगीकरण ही आवश्यक व अटळ प्रक्रिया (Privatization is Certain and Necessary Process) :

जगातील बहुतेक सर्वच देशानी जागतिकीकरणाच्या धोरणाचा अवलंब केला आहे. जागतिकीकरणाचा एकदा अवलंब केल्यावर खाजगीकरणाचा अवलंब करणे अटळ ठरते. कारण त्याशिवाय जागतिकीकरणाच्या अटी पूर्ण होऊ शकत नाहीत. या धोरणाचे अर्थव्यवस्थेवर कितीही बरेवाईट परिणाम झाले तरी जागतिकीकरणास मान्यता देणाऱ्या कोणत्याही देशास त्याला विरोध करता येत नाही. खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या संचालनासाठी खाजगीकरण आवश्यक आहे. यामुळे या धोरणाचे समर्थन केले जाते.

ब) खाजगीकरणाचे प्रतिकूल परिणाम/(Demerits Effect of Privatization)

१. सामाजिक हिताकडे दुर्लक्ष (Neglected to Social Benefits) :

सार्वजनिक उद्योग हे शासनामार्फत सामाजिक हितासाठी प्रसंगी तोटा सहन करूनही चालविले जातात. खाजगी क्षेत्रात वैयक्तिक हित व नफ्यास प्राधान्य दिले जाते. सार्वजनिक क्षेत्रात खाजगीकरणाचा अवलंब केल्याने सामाजिक हिताकडे दुर्लक्ष होऊ शकते. त्यामुळे तेल, वायु, खनिजसंपत्ती, वीज निर्मिती असे सार्वजनिक हितासाठी आवश्यक उद्योग खाजगी क्षेत्राच्या ताब्यात देऊ नये असे सांगितले जाते.

२. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण (Centralization of Financial Power) :

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग महत्त्वपूर्ण असून त्यांचा विस्तारही मोठा असतो. असे उद्योग खाजगी व्यक्तींच्या ताब्यात गेल्यास त्यांच्याकडे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊन जीवनावश्यक वस्तु व सेवांच्या क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होऊन आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होण्याचा धोका निर्माण होतो.

३. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वात वाढ (Dominance of MNC's) :

बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक ताकद प्रचंड असते. खाजगीकरणामुळे या कंपन्यांना सार्वजनिक क्षेत्रावर वर्चस्व निर्माण करणे सहज शक्य होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील एका प्रचंड विस्तारलेल्या महत्त्वपूर्ण क्षेत्रावर या कंपन्यांचे व पर्यायाने परकीय देशांचे नियंत्रण प्रस्थापित होऊ शकते. हे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने हानीकारक आहे.

४.कामगार कपातीमुळे बेरोजगारीत वाढ (Increase in Unemployment) :

सार्वजनिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कामगार भरती केल्याने हजारो लोकांना रोजगार उपलब्ध होतो. अशा उद्योगांचे व्यवस्थापन व मालकी खाजगी क्षेत्राकडे गेल्यास अशा उद्योगांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आधुनिकीकरणाच्या मार्गाचा अवलंब केला जातो व त्यानंतर कामगार कपात केली जाते. यातून बेरोजगार लोकांची संख्या वाढते.

५. राष्ट्रीय उत्पन्नाचे असमान वाटप (Unequal distributions of National Income) : सार्वजनिक उद्योगांचा नफा शासनामार्फत सामाजिक हितासाठी वापरला जातो. त्यामुळे त्याचे समाजामध्ये समान व न्याय्य वाटप होण्यास चांगला वाव असतो.

## जागतिकीकरण (Globalization)

१९८०च्या दशकात जगातील सर्वच राष्ट्रांनी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पना महत्त्वाच्या मानून त्यादृष्टीने बदल करण्यास सुरूवात केली. उदारीकरण व खाजगीकरणाचा अंतिम उद्देश अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करणे हाच आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, युनो, गॅट यासारख्या जागतिक संघटनांनी आंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. जागतिकीकरणालाच मुक्त अर्थव्यवस्था असेही म्हणतात.

### जागतिकीकरणाच्या व्याख्या (Definitions of Globlization) )

प्रा. स्टिग्लीटझ :

जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध देश व विविध देशातील लोकांचे घडून आलेले एकत्रिकरण जे वाहतूक व दळणवळणाच्या खर्चात झालेल्या प्रचंड घटीमुळे व वस्तु, सेवा, भांडवल, ज्ञान, तंत्रज्ञान हे लोकांच्या सीमेपलीकडील हालचालीवरील कृत्रिम बंधने नष्ट झाल्याने घडून येते.

### जागतिकीकरणाचे परिणाम (Effects of Globalization) :

अ) जागतिकीकरणाचे अनुकूल परिणाम (Favourable Effects of Globalization)

१. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ (Increase in National Income) :

जागतिकीकरणाच्या धोरणाचा यशस्वीपणे अवलंब केल्यामुळे देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीस चालना मिळाली आहे. १९९० नंतरच्या काळात जागतिक उत्पादन वाढीच्या दरात वाढ होत आहे. १९८०-९० या काळात एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ५.६ टक्के होता तो १९९३ ते २००१ या काळात ७ टक्के पर्यंत वाढला. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात तो ८.५ टक्के होता. सन २००९-१० मध्ये ८.४ टक्के, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ७.२ टक्के तर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात ८.२ टक्के इतका होता. राष्ट्रीय उत्पन्न वाढीमुळे दरडोई उत्पन्नात देखील वाढ झाली आहे.

२. परकीय गुंतवणूकीत वाढ (Increase in FDI) :

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (LPG) या संकल्पनाचा प्रभावीपणे वापर केल्यामुळे परकीय गुंतवणूकदार भारताकडे आकर्षित झाले व भारताकडे थेट विदेशी गुंतवणूकीचा ओघ वाढू लागला आहे.

३. सेवाक्षेत्राच्या विकासात वाढ (Increase in Service Sector Growth) :

जागतिकीकरणामुळे भारतात सेवाक्षेत्राच्या विकासाला अधिक चालना मिळाली आहे. एकूण राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा ५६ टक्के इतका वाढला आहे. सेवाक्षेत्राच्या उत्पादनात १३ टक्के वाढ झाली आहे. तसेच टेलिकम्युनिकेशन्समध्ये १० टक्के, वाहतूक व दळणवळण सेवांमध्ये ९ टक्के, संगणकीय सेवा १८ टक्के दराने वाढ झाली आहे. अलिकडच्या काळात भारतातून बाह्यस्त्रोतार्थ सेवांच्या बाजारपेठेत वाढ झाली असून त्यातील उलाढाल ५० अब्ज डॉलर इतकी झाली.

४. औद्योगिक उत्पादनात वाढ (Increase in Industrial Production) :

जागतिकीकरणामुळे विदेशी गुंतवणूक, विकसित देशातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची व यंत्रसामग्रीची व श्रमाची आयात सहज शक्य झाल्याने औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे. देशात वाहन, रसायन, कापड, अभियांत्रिकी, औषधनिर्मिती इ. सर्व प्रकारच्या उद्योगांचा विकास झाला आहे. सन २०१० मध्ये औद्योगिक विकासाचा दर १३.१ टक्के इतका होता तो २०१६-१७ मध्ये ८.३ टक्के इतका झाला आहे. औद्योगिक क्षेत्रात उत्पादीत होणाऱ्या वस्तूंच्या निर्यातीत वाढ झाल्याने भारताला विदेशी चलन अधिक प्रमाणात उपलब्ध होऊ लागले आहे.

५. परकीय व्यापारात वाढ (Increase in Foreign Trade) :

जागतिकीकरणामुळे आयात-निर्यातीवरील अनेक अनिष्ट निर्बंध उठविल्यामुळे देशाच्या परकीय व्यापारात वाढ झाली आहे. अमेरिका, जपान, चीन, आखाती देश, युरोपीयन देश इत्यादी देशांशी असलेल्या व्यापारात वाढ झाली आहे. विशेष आर्थिक क्षेत्राच्या (SEZ) निर्मितीमुळे निर्यात वाढीस चालना मिळत आहे. सन २०११ मध्ये २८ अब्ज डॉलर इतकी निर्यात झाली. तर आयात ३२.८ अब्ज डॉलर झाली.

६. विदेशी व्यावसायिक संधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ (Increase in Foreign Business Opportunity) :

१९९१च्या नवीन आर्थिक धोरणामुळे अलीकडच्या काळात नवपदवीधर, कुशल अभियंते, तंत्रज्ञ, संगणकीय क्षेत्रातील तज्ज्ञ यांना परदेशातून चांगली मागणी वाढल्याने अमेरिका, युरोप, आखाती देश अशा अनेक देशातून लक्षावधी भारतीयांना नोकरीच्या व व्यावसायाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत असे अनिवासी भारतीयांकडून भारतात मोठ्या प्रमाणात परकीय चलन पाठविले जाते. ६.

**जागतिकीकरणाचे प्रतिकूल परिणाम/(Adverse Effect of Privatization)**

जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रतिकूल परिणाम पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतात.

१. शेतीक्षेत्रावर झालेला प्रतिकूल परिणाम (Adverse Effect on Agriculture Sector) :

जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेची सर्वांगीण प्रगती होत असली तरी शेतीक्षेत्रावर मात्र प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. सन १९५१ ते २०१८ पर्यंतचा प्राधान्याने विचार केला तर शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मात्र घटत चालला आहे. शेतीक्षेत्रात गुंतवणूकीचे प्रमाण कमी होणे, अत्याधुनिक बी-बीयाणे, खते, किटकनाशके व किडनाशकांचा अयोग्य व अपूरा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, अन्नप्रक्रिया उद्योगांचा मंदगतीने होणारा विकास, केंद्र व राज्य सरकारचे शेतीक्षेत्राशी संबंधित सहकार क्षेत्राकडे दुर्लक्ष अशा विविध कारणामुळे शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील (GDP) वाटा कमी होत आहे. परंतु शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मात्र स्थिर आहे.

२. चलनवाढीच्या दरात सातत्याने वाढ (Increase in Inflation Rate) :

LPG धोरणाचा भारत सरकारने स्विकार केल्यानंतर चलनवाढीच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. केंद्र सरकार व देशाच्या मध्यवर्ती बँकेने (RBI) चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी विविध उपाययोजना केल्या असल्या तरी चलनवाढीचा दर हा दोन आकडी राहिला आहे. चलनवाढीला अंतर्गत व बाह्यघटक कारणीभूत आहे. खाद्यान्नाच्या किंमतीत झालेली वाढ, जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेली वाढ इत्यादी घटक कारणीभूत आहे. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेतही सर्वच वस्तू व सेवांच्या किंमतीत वाढ होऊन चलनवाढ होत आहे.

३. आंतरराष्ट्रीय बाजारात रूपयांच्या मूल्यात घसरण (Devaluation of Rupees in International Market):

जानेवारी १९९१ मध्ये भारताचा परकीय चलनसाठा १.२ बिलीयन डॉलर इतकाच शिल्लक होता तर जून १९९१ मध्ये हा चलनसाठा फक्त ०.६ बिलीयन डॉलर इतकाच शिल्लक राहिल्याने व आखाती युध्दामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे भाव प्रचंड प्रमाणात वाढल्याने या संकटातून सावरण्यासाठी भारताला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) कडून मोठे कर्ज घ्यावे लागल्याने भारताने रूपयांचे १०.७८ टक्के अवमूल्यन केल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात रूपयांच्या मूल्यात सातत्याने घसरण झाली.

४. आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांचा दबाव वाढला (Presssures of International Financial Institutions) :

LPG धोरणामुळे जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी UNO यासारख्या वित्त संस्थांना भारताच्या अर्थकारणात हस्तक्षेप करण्याची संधी मिळत आहे. परिणामी या संस्था विकसनशील देशांचे शोषण करण्याचा व विकसनशील, अविकसित देशांवर वर्चस्व गाजवण्याचा नेहमीच प्रयत्न करत आहे. म्हणजेच अप्रत्यक्षरित्या विकसित देश विकसनशील व अविकसित देशांवर दबावाचे राजकारण करत आहे.

५. राजकीयहस्तक्षेपातवाढ(PoliticalInterfarance):

जागतिकीकरणाच्या नावाखाली जगातील विकसित राष्ट्रे ही जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) अशा वित्तसंस्थांच्या आधारे नववसाहतवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. विकसित राष्ट्रांची कालबाह्य व निकृष्ट उत्पादने विकसनशील देशाच्या बाजारपेठांमध्ये विकतात. तसेच पर्यावरण प्रदूषित करणारे कारखाने, बहुराष्ट्रीय कंपन्यांमार्फत विकसनशील देशात स्थापन केले जातात. अशा विविध कारणांमुळे हस्तक्षेप वाढत आहे.

६. देशांतर्गत स्पर्धेत मोठी वाढ (Increase in Domestic Competition) :

उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणामुळे (LPG धोरण) देशांतर्गत बाजारपेठा (विदेशी) बहुराष्ट्रीय कंपन्यांना खुल्या झाल्याने याचा अधिक फायदा या बहुराष्ट्रीय कंपन्यांनाच अधिक प्रमाणात होऊ लागला आहे. देशी कंपन्या या विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर स्पर्धा करू शकत नाही.

## जागतिक युगात सहकारी चळवळीतील संधी (Opportunities for Cooperative Movement in Global Era)

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी महाराष्ट्रात सहकार चळवळीचा उदय व विस्तार झालेला होता. परंतु महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सहकारी चळवळीचा अधिक प्रमाणात विस्तार व विकास झालेला आहे. आज देशात महाराष्ट्र राज्य हे सहकारी चळवळीच्या माध्यमातून नावलौकिक प्राप्त राज्य म्हणून ओळखले जाते. १९४८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील लोणी (प्रवरानगर) येथे पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन करून सहकाराची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. १९६०-६१ नंतर राज्याच्या ग्रामीण आर्थिक परिवर्तनात सहकारी चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. महाराष्ट्रात गेल्या ६० वर्षात सहकारी पतपुरवठा चळवळ, सहकारी सूत गिरण्या, सहकारी साखर कारखाने, दुग्ध सहकारी संस्था, दुग्ध प्रक्रिया सहकारी उद्योग, सहकारी खरेदी विक्री संस्था, नागरी सहकारी संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, ग्राहक सहकारी संस्था, विद्यार्थी भांडारे, मच्छिमार सहकारी संस्था व इतर संस्थांचा विकास झाल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी आली आहे. जागतिकीकरणाच्या युगात सहकारी चळवळीतील संधी पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. कृषी विकासाची संधी :

जागतिकीकरणाच्या युगात कृषी क्षेत्राचा विकास करणे हा देशाच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगिक विकासाचा मूळ आधार आहे. जागतिकीकरणामुळे सरकारचे सहकार क्षेत्राकडे दुर्लक्ष झाल्याने त्याचा परिणाम भारतीय शेती क्षेत्राच्या आर्थिक विकासावर देखील झाला आहे. म्हणून जागतिक युगात देशातील शेती व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था, सहकारी सूतगिरण्या, सहकारी साखर कारखाने, शेतमाल सहकारी खरेदी विक्री संघ, दुग्ध उत्पादक सहकारी संस्था, दुग्ध प्रक्रिया सहकारी उद्योग संस्था इ. संस्थांचा विकास व विस्ताराच्या आधारे शेतीक्षेत्राचा विकास करण्याची संधी आहे.

२. पायाभूत सुविधांच्या संधी :

महाराष्ट्रात १९६०-६१ नंतर सहकारी संस्थांच्या प्रयत्नातून रस्ते, रेल्वे, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वाहतूक व दळणवळण इ. पायाभूत सुविधांची निर्मितीत सहकारी चळवळीचे योगदान महत्त्वाचे आहे. सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात विविध प्रकारच्या पायाभूत सेवांची निर्मिती करण्यास अजून खूप वाव आहे. देशातील ग्रामीण व शहरी भागाच्या आर्थिक विकासास पोषक अशा सुविधांवर सहकारी संस्थांनी भर दिल्यामुळेच या भागात राहणाऱ्या गरजू व दुर्बल सभासदांच्या राहणीमानात वाढ झाली आहे व अजूनही या लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ करण्यास वाव आहे. शासकीय खर्च वा खाजगी उपक्रमाद्वारे अशा प्रकारच्या पायाभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देणे अशक्य आहे.

३ रोजगार वाढीतील योगदान :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध उद्योग व व्यवसायात अत्याधुनिक यंत्रे व तंत्रज्ञान, आधुनिक व्यवस्थापन पद्धती, भांडवल प्रधान साधनसामग्रीचा मोठ्या प्रमाणात वापर वाढल्याने भारतासारख्या

विकसनशील देशात बेरोजगारीच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. देशातील या गरजू व बेरोजगार व्यक्तींची वाढती संख्या विचारात घेऊन ग्रामीण व नागरी सहकारी संस्था, दुग्ध व दुग्धप्रक्रिया सहकारी संस्था, सहकारी कुक्कुटपालन, सहकारी कापूस व सुत उद्योग, सहकारी साखर कारखाने, सहकारी खरेदी-विक्री संघ, सहकारी ग्राहक व विद्यार्थी भांडारे, गृहनिर्माण सहकारी संस्था, मच्छिमार सहकारी संस्था व सहकारी मजूर फेडरेशन इ. संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील जास्तीत जास्त लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्याचे काम सहकारी चळवळीने केले आहे

४. शैक्षणिक विकासात योगदान देण्याची संधी :

शैक्षणिक सुविधांची निर्मिती हा कोणत्याही देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा निर्देशक मानला जातो. सहकारी साखर कारखानदारीने १९८० नंतरच्या दशकात आणि अभियांत्रिकी, वैद्यकीय, औद्योगिक प्रशिक्षण, कला, वाणिज्य व विज्ञान, कृषी महाविद्यालये इत्यादी विविध महाविद्यालये स्थापन करून शैक्षणिक संकुले निर्माण केली आहे. उदा. प्रवरा सहकारी साखर कारखाना लोणी व अमृतवाहिनी सहकारी साखर कारखाना, संगमनेर इ. साखर कारखान्यांशी सलग्न संस्था लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे व देशातील सुसंस्कृत नागरीक घडविण्याचे महत्त्वाचे कार्य करत आहे.

५. बचत संकलनातील संधी :

सहकारी चळवळीमुळे देशातील ग्रामीण व शहरी भागात पतपुरवठा करणाऱ्या सहकारी पतसंस्थांची व सभासदांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जागतिक युगात लोकसंख्येत भरमसाठ वाढ होत आहे. जगातील सर्व अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडल्या जात आहे. पर्यायाने आजही ग्रामीण व शहरी भागातील लोकांकडून मोठ्या प्रमाणात बचती गोळा करून, सभासदांच्या संख्येत वाढ करून भांडवलनिर्मितीत वाढ करण्याची मोठी संधी जागतिकीकरणाच्या युगात या सहकार क्षेत्राला आहे. तसेच ग्राहक सहकारी संस्था, विद्यार्थी भांडारे यांच्याद्वारे सभासदांना स्वस्त दराने वस्तू उपलब्ध करून देवून सभासदांच्या बचतीत वाढ करण्याची मोठी संधी सहकार चळवळीला आजही उपलब्ध आहे.

६.प्रादेशिक असमतोल दूर करण्याची संधी :

भारतातील घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशात शेती, उद्योग, सेवा, व्यापार, औद्योगिकीकरण इ. विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल आहे. तसेच प्रदेशानुसार काही विशिष्ट प्रदेशाचा अधिक विकास झाला आहे. तर काही प्रदेश हे विकासापासून वंचित आहे. जागतिक युगात शेती उद्योग सेवा, व्यापार, वाहतूक व दळणवळण अशा विविध क्षेत्रात आर्थिक विकासाचा जो अनुशेष आहे तो अनुशेष भरून काढण्याची संधी सहकार चळवळीला जागतिकीकरणाच्या काळात उपलब्ध आहे.

७. दारिद्रयनिर्मुलन करण्याची संधी :

सहकारी संस्था, सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सहकारी शेतमाल प्रक्रिया उद्योग, दुग्ध सहकारी व दुग्ध प्रक्रिया उद्योग, सहकारी ग्राहक भांडारे, गृहनिर्माण सहकारी संस्था, मच्छिमार सहकारी संस्था व श्रमिकांच्या सहकारी संस्थांनी ग्रामीण व शहरी भागातील गरजू व्यक्तींना अर्थसहाय्यांचा आधार देऊन ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य निर्मुलनात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

८. राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करण्यास वाव : सहकारी चळवळीमुळे देशात अनेक सहकारी संस्था स्थापन झाल्या व त्यांचा विकास व विस्तार देखील झपाट्याने झाला आहे. या सहकारी संस्थांच्या संख्येतील वाढीबरोबर सभासदांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली. पर्यायाने अशा सभासदांना सहकारी संस्थेच्या सभासदत्वाचे अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मिळू लागल्याने देशातील ग्रामीण व शहरी भागातील सहकार चळवळीशी संलग्न लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

९. ग्रामीण विकासातील संधी :

सहकारी चळवळीच्या माध्यमातून देशातील ग्रामीण भागात सहकाराचे मोठे जाळे निर्माण झाल्याने ग्रामीण भागात ग्रामीण रस्ते, वाहतूक व दळणवळणाच्या सोयी, ग्रामीण विद्युतीकरण, सहकारी खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून गोदामांची निर्मिती, शिक्षण व आरोग्य सुविधा दूरसंचार साधने, करमणूकीची साधने, गृहनिर्माण सहकारी संस्था इ. विविध ग्रामीण पायाभूत सुविधांच्या सहाय्याने ग्रामीण भागाचा विकास व विस्तार झालेला आहे.

१०. सहकारी चळवळीत गुणात्मक विकासाची संधी :

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागातील सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या नेत्यांनी सहकारात केलेल्या चांगल्या कामामुळे शासनाने दिलेल्या प्रोत्साहन व आर्थिक मदतीमुळे सहकारी संस्थांचा संख्यात्मक विकास झाला. परंतु गुणात्मक विकास मात्र दुर्लक्षित राहिला. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या स्पर्धेमुळे सहकारी चळवळीत गुणात्मक विकासाची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणून जागतिक युगात सहकारी चळवळीच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षण देवून, व्यावसायिकता, राजकीय तटस्थता, आत्मनिर्भरता, शासकीय हस्तक्षेपाचा अभाव इत्यादी तत्त्वांचा अवलंब करून सहकारी चळवळीचा गुणात्मक विकास करण्याची खूप मोठी संधी जागतिक युगात आजही सहकारी संस्थांना उपलब्ध आहे.

---

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ.धीरज झाल्टे व इतर, सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती(२०२०), प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.

२) प्रा.नंदा लहाडे, सहकार (२०१३), आयडॉल पब्लिकेशन, पुणे.

३) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास क्रम संशोधन मंडळ ,पुणे : सहकार

४) तापकीर मुकुंद व साबळे आर.जे. (२००५), सहकार ,निराली प्रकाशन ,पुणे

५) डॉ. आर के दातीर (२००९) ‘भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार , निराली प्रकाशन,पुणे

६) जोशी सी जे (१९८६ ), सहकार , फडके प्रकाशन, कोल्हापूर